**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
**ता.वसई, जि. पालघर**

जा.क्र. वविशम/भांडार/१९७/२०२२
दिनांक :- २४/०५/२०२२

## <u>जाहिर दरपत्रक</u>

याद्वारे सर्व पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे हेल्मेट व लाठी इ. साहित्य पुरविण्यासाठी इच्छुक पुरवठादार व संस्था यांचेकडून दि. ०१/०६/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता बंद पाकिटातून दरपत्रके (कोटेशन) मागविण्यांत येत आहेत. सदरची दरपत्रके मुख्यालय आवक-जावक विभागात सादर करण्यात यावी.

| अ.क्र | तपशिल | आवश्यक नग |
|---|---|---|
| १. | <u>हेल्मेट</u> (Anti-Riot Helmet with visor & iron net )<br>Shape : Round Shape Shell<br>Surface : Smooth | ५० नग |
| २. | <u>लाठी</u> (POLICARBONATE)<br>Total Length : १ Meter (+ २ cm.)<br>Raw Materials : Poly Corbonate<br>Colour : Transparent | ५० नग |

### <u>अटी - शर्ती</u>

१) पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दर पत्रकावर वस्तू व सेवाकर नोंदणी क्रमांक (GST) असणे बंधनकारक राहील.
२) मालकाचे / संस्थेचे पनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.
३) दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालयतील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.
४) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून ७ दिवसांत करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
५) दरपत्रकात नमुद साहित्यांचे दर हे सादर करताना मुळ किंमत, वस्तू व सेवाकर (GST), वाहतूक खर्च वेगवेगळे दर्शविण्यात यावेत.
६) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उप आयुक्त (भांडार) यानां राहील.
७) वरील अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.
८) यासंबधींची दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दि. ०१/०६/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ०१/०६/२०२२ रोजी सायं. ४.०० वाजता मा. उप आयुक्त (भांडार) यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्याचे समक्ष उघडण्यात येतील.

**स्थळ :- मुख्य कार्यालय, विरार**
**दिनांक :- २४/०५/२०२२**

(शंकर खंदारे)
उप आयुक्त (भांडार)
वसई-विरार शहर महानगरपालिका